अमृत सेवाभावी संस्था, परभणी संचलीत,

# कै. कु. दुर्गा क. बनमेरु विज्ञान महाविद्यालय,

लोणार ता. लोणार जि. बुलडाणा ४४३३०२

**AY 2019-20**

## महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

## अहवाल

महाविद्यालयात दि.५ सप्टें. २०१९ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमृत सेवाभावी संस्थेचे सचिव, मा. डॉ. संतोष क. बनमेरु हे होते. तर प्रमुख वक्ते व अतिथी म्हणुन श्री शिवाजी महाविद्यालय चिखली येथील प्रा. डॉ. गणेश माल्टे सर यांना आमंत्रीत केले होते. माजी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणुन श्री अभिजित निचंग हे उपस्थित होते. प्रा. डॉ.महेंद्र भिसे यांनी कार्यक्रमाच्या सुरवातीला आपल्या प्रास्ताविकातुन महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांची नाळ महाविद्यालया सोबत टिकुन राहावी व त्याचे महत्वाचे योगदान महाविद्यालयाच्या विकासासाठी मिळावे या उददेशाने माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करणे गरजेचे आहे व त्यासाठी माजी विद्यार्थ्यांची बैठक घेउन आजच्या कार्यक्रमाची रुपरेषा मांडली.





या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणुन लाभलेले डॉ. गणेश माल्टे सर यांनी आपल्या व्याख्यानातुन प्रथमतः शिक्षक दिनाच्या उपस्थितांना शुभेच्छा देउन महाविद्यालयाच्या नॅक मुल्यांकन करिता व शैक्षणिक धोरणाप्रमाणे माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करणे अत्यंत गरजेचे आहे असे स्पष्ट केले. तसेच माजी विद्यार्थ्यांच्या सुचना,उपक्रम या महाविद्यालयासाठी प्रेरणादायी असतात. त्यांच्या सहकार्याने गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी,सामाजीक प्रश्न सोडविण्यासाठी ,आर्थिक सहकार्य उपलब्ध व्हावे या उददेशाने माजी विद्यार्थी संघटनेने काम करणे अपेक्षीत आहे असे सुचित केले. तसेच वेळात वेळ काढुन आपण ज्या महाविद्यालयात शिकलो. त्या महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान आवश्यक असल्याचे सांगितले.

अमृत सेवाभावी संस्था, परभणी संचलीत,

# कै. कु. दुर्गा क. बनमेरु विज्ञान महाविद्यालय,

लोणार ता. लोणार जि. बुलडाणा ४४३३०२

तसेच शिक्षक दिनानिमित्त प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचे महत्व सांगतांना विद्यार्थी हा को-या पाटिने येत असतो व त्याचे सर्वांगीण विकास करण्याचे काम ख-या अर्थाने शिक्षक करत असतो. व्हॉटस अप,फेसबुक, इन्स्ट्राग्राम या साधनांचा उपयोग विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येय प्राप्तीसाठी करावा असे विद्यार्थ्यांना सांगितले. दरम्यान भारतातील महान व्यक्तीमत्व डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांची जयंती ही शिक्षक दिन म्हणुन साजरी केली जाते. इतर सर्व महान विभुतींची त्यांच्या शिक्षणाची, संघर्षाची,त्यागाची उदाहरणे त्यांनी मांडली. सकारात्मक दृष्टिकोनातुन व शिक्षक विद्यार्थी या दोघाच्या सयुंक्त प्रयत्नातुन विद्यार्थ्यास यश प्राप्त होत असते असा मोलाचा संदेश डॉ. माल्टे यांनी दिला.

यानंतर माजी विद्यार्थी प्रतिनिधी श्री अभिजीत निचंग यांनी सकारात्मक दृष्टिकोन या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. संतोष बनमेरु यांनी सर्व उपस्थित प्राध्यापकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व महाविद्यालयातील विद्यार्थीनी,विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याचा दृष्टिकोनातुन कठोर परिश्रम करावे असा मौलीक सल्ला दिला. सदर कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरु सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमास माजी विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. उपस्थित सर्व मान्यवरांचे,माजी विद्यार्थ्यांचे आभार डॉ. भिसे यांनी मांडले.





समन्वयक
Dr. M R Bhise

प्राचार्य
Principal
Late. Ku. Durga K. Banmeru Science College
LONAR, Dist.Buldhana